0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०१/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१४/२०१३/जा.१६६, दिनांक ०२/०३/२०१३.

३) मे. हाजीभाई मुसाभाई चे भागीदार इस्माईलभाई मुसाभाई डेरेय्या व युसूफभाई मुसाभाई डेरेय्या यांचे दिनांक १२/०३/२०१३ रोजीचे संयुक्त निवेदन.

४) पोलिस उपनिरिक्षक, जोगेश्वरी पोलिस ठाणे यांचे दिनांक १३/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

५) अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे पत्र क्र. एफटीएल/एफडीओ/२०/१३ अन्वये दक्षता शाखेकडून दिनांक १६/०४/२०१३ रोजी प्राप्त प्राप्त पृथ:करण अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१४/२०१३/जा.४५९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २० /०५ /२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १५/०२/२०१३ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ व त्यांचे अधिकारी/कर्मचारी तसेच या कार्यालयातीत फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह सुमारे २०.३० वाजता हाजीभाई मुसाभाई, दुकान क्रमांक ४, इक्बाल इमारत, गुंफा रोड, जोगेश्वरी (पूर्व) येथे भेट देऊन तपासणी केली. भेटीच्या वेळीस सदर ऑईल डेपोच्या सेल कांऊटरवर बसलेल्या एका इसमास अधिकाऱ्यांनी त्याचे नांव, गांव विचारले असता, त्याने त्याचे नांव इस्माईल मुसाभाई डेरेय्या असे सांगितले. त्याचेकडे सखोल चौकशी केली असता, त्याने सदर ठिकाणी खाद्यतेल विक्रीचा घाऊक तसेच किरकोळ व्यवसाय करीत असल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सदर व्यवसायाकरिता परवाना धारण केला आहे किंवा कसे ? याबाबत विचारणा केली असता, मे. हाजीभाई मुसाभाई या व्यवसायीक नावाने खाद्यतेलाचा घाऊक परवाना क्रमांक २६/ड/घा/२, दिनांक ३१/१२/२०१४ पर्यंत वैध असलेला व खाद्यतेलाचा किरकोळ परवाना क्रमांक २६/ड/आर/१, दिनांक ३१/१२/२०१४ पर्यंत वैध असलेला परवाना सादर केला. सदर दोन्ही परवाने इस्माईल

मुसाभाई डेरेय्या व युसूफ मुसाभाई डेरेय्या या दोन भागीदारांच्या नांवे असल्याचे पथकास दिसून आले. इस्माईल मुसाभाई डेरेय्या यांना सदर दोन्ही परवानाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले दस्ताऐवज म्हणजेच साठा नोंदवही, विक्री नोंदवही, आवक बिले, गुमास्ता परवाना, अन्न भेसळ परवाना इत्यादी कागदपत्रे सादर करण्यास सुचित केले असता, त्यांनी येणेप्रमाणे कागदपत्रे सादर केली. १) गुमास्ता परवाना क्रमांक KE००१४१७/ SHOP I दिनांक ३१/१२/२०१३ पर्यंत वैध. २) अन्नभेसळ परवाना क्रमांक ११५११००४०००१६७, वैधता दिनांक ३१/१२/२०१३. ३) वजन मापे प्रमाणपत्र क्रमांक ४९९४२८, वैधता दिनांक १३/०३/२०१३ व ४) वजन मापे प्रमाणपत्र क्रमांक ४९९४२९, वैधता १३/०३/२०१३. तद्नंतर अधिकाऱ्यांनी उपस्थित भागीदार इस्माईल मुसाभाई डेरेय्या यांना सुचित केलेनुसार, घाऊक परवान्याचे साठापुस्तक, भेटवही, खाद्यतेलाची आवक झालेली खरेदी बिले इत्यादी दस्ताऐवज अधिकाऱ्यांना तपासणीकरिता सादर केली. सदर परवानाधारकाची दिनांक ०७/१२/२०१० पासून ते दिनांक १५/०२/२०१३ पर्यंतच्या घाऊक नोंदवहीमधील साठा दर्शविलेला आवकबाबतच्या आर.बी.डी. पामतेलाची एकूण ५६ खरेदी बिलांपैकी फक्त दोनच बिले तपासणीकरीता सादर केली. उर्वरीत बिले तपासणीकरीता सादर केली नाहीत.

सदर परवानाधारकाने घाऊक साठा नोंदवहीमध्ये एकूण १० खरेदी बिलांप्रमाणे (तपासणीच्यावेळी सादर केलेली बिले) ९७७५० लिटर आर.बी.डी. पामोलिन साठ्याची नोंद साठा नोंदवहीत न दर्शविता त्याची परस्पर विक्री केल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. सदरचे विक्रीबाबतचे कॅशमेमो ठेवलेले नसल्याचे दिसून आले. सबब, झालेली विक्री संशयास्पद आढळून येते. परवानाधारकाने घाऊक परवान्यावरील विक्री ही सदर दुकानांतून किरकोळ विक्रीद्वारे म्हणजेच काऊंटर सेलद्वारे केलेली आहे असे प्रथमदर्शनी अधिकाऱ्यांना दिसून आले.

सदर घाऊक परवान्याची रितसर सखोल तपासणी करण्यात आली. सदर तपासणीत परवानाधारकाकडे ११७०० लिटर प्रत्यक्ष साठा आढळून आला. सदर तपासणीत आढळलेल्या त्रुटी पुढीलप्रमाणे, १) साठाफलक/ भावफलक लावलेला नाही. २) साठा पुस्तक दिनांक १३/०२/२०१३ पर्यंतच लिहीलेले आढळले. ३) पामतेलाची प्रत्यक्ष शिल्लक ८३० लिटर्सने जास्त आढळली. ४) माहे मे २०११ मध्ये पामतेलाची एकूण विक्री ७११० असताना साठा नोंदवहीमध्ये ७१०९ लिटर्स नोंदविली. त्यामुळे फरक १ लिटर आढळला. ५) माहे जुलै २०११ मध्ये पामतेलाची एकूण विक्री १६१२५ असताना साठा नोंदवहीमध्ये १५९०० लिटर्स दर्शविली असल्याने फरक २२५ लिटर्स आढळला. ६) माहे ऑगस्ट २०१२ मधील अखेरची शिल्लक ४६३६० असताना माहे सप्टेंबर २०१२ मध्ये आरंभीची शिल्लक ४६३२५ लिटर्स साठापुस्तकात दर्शविल्याने फरक ३५ लिटर्स आढळला. ७) मागील तपासणी दिनांक ०६/१२/२०१० नंतर आवक झालेल्या व साठा नोंदवहीमध्ये नोंद घेतलेल्या एकूण ५६ बिलांपैकी फक्त २ बिले उपलब्ध केली. उर्वरीत ५४ बिले तपासणीसाठी उपलब्ध केलेली नाहीत. ८) घाऊक साठा नोंदवहीत नमूद केलेल्या आवक झालेल्या बिलांच्या नोंदीप्रमाणे एकूण १० खरेदी बिलांपैकी ९७७५० लिटर्स आर.बी.डी. पामोलीन साठयाची नोंद घेतलेली नाही अथवा दर्शविलेली नाही. त्याची नोंद नोंदवहीत न दर्शविता परस्पर विक्री केल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. तसेच सदरची विक्रीबाबतचे कॅशमेमो ठेवलेले नाही. सबब झालेली विक्री ही संशयास्पद

आढळून येते. ९) घाऊक परवान्याची विक्रीचे रोख पावती पुस्तक ठेवलेले नाही. त्यामुळे घाऊक परवान्यावर दर्शविण्यात आलेली विक्री ही बेकायदेशीर असल्याचे साशंकता प्रथमदर्शनी दिसून येते. १०) घाऊक परवाना वरील विक्री ही सदर दुकानातून काऊंटर सेलद्वारे केलेली आहे, असे तपासणीत सकृतदर्शनी आढळून आले.

त्यानंतर सदर परवानाधारकाकडे असलेल्या किरकोळ परवान्याचे साठापुस्तक तसेच खाद्यतेलाची आवक झालेली खरेदीबिले इत्यादी या सादर केलेल्या दस्ताऐवजाची तपासणी केली असता, दिनांक ०७/१२/२०१० ते १५/०२/२०१३ पर्यंत एकूण ९५ साठा आवक नोंदी दर्शविल्याचे आढळून आले. त्याअनुषंगाने सदर आवक साठ्याची खरेदी बिले सादर करण्यास सुचित केले असता, परवानाधारकाने किरकोळ परवान्यावर खरेदी केलेल्या खरेदी बिले तपासणीकरीता सादर केली नाहीत. त्यामुळे परवानाधारकाने एकूण ९५ खरेदी बिले सादर केली नसल्याचे आढळले.

सदर किंरकोळ परवान्याची रितसर सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीचा तक्ता खालीलप्रमाणे,

(आकडे लिटर्समध्ये)

| खाद्यतेल प्रकार | प्रा. शि. | आवक | एकूण | विक्री | पु.शि. | प्र.शि. | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आर.बी.डी. पामोलीन | ५६० | २१८४० | २२४०० | १८६०० | ३८०० | ३२७ | -३४७३ |
| शेंगदाणा तेल | २२० | ८८७ | ११०७ | ११०७ | - | ८७५ | +८७५ |
| खोबरेल तेल | ९१० | १७०० | २६१० | २३४० | २७० | २७० | - |
| राई तेल | १२०० | ३६९० | ४८९० | ४४०० | ४९० | ७१० | +२२० |
| सुर्यफुल तेल | ९९० | १५३१० | १६३०० | १५४०० | ९०० | ७८१ | -११९ |
| वनस्पती | ८५० | ५४६० | ६३१० | ५५१० | ८०० | ३१५ | -४८५ |
| कपासी तेल | निरंक | निरंक | निरंक | निरंक | नाही | १०३५ | +१०३५ |
| तिळ तेल | निरंक | नाही | नाही | निरंक | नाही | ४४.६० | +४४.६० |

किरकोळ परवान्याच्या तपासणीमध्ये पुढील दोष आढळून आले. १) साठाफलक/भावफलक लावलेला नसल्याचे आढळले. २) दिनांक ०७/१२/२०१० ते १५/०२/२०१३ या कालावधीमध्ये किरकोळ परवान्यावर आवक झालेल्या खाद्यतेलाच्या एकूण ९८ बिलांपैकी एकही बिल तपासणीकरीता सादर केले नाही. ३) किरकोळ परवान्याच्या साठापुस्तकात कॉटनसीड ऑईल व तिळ तेल यांच्या साठयाबाबतची नोंद घेतली नाही. ४) साठेपुस्तकात खाडाखोड केल्याचे आढळले. ५) किरकोळ विक्रेत्याचे पावतीपुस्तक ठेवले नाही. ६) दिनांक ०७/१२/२०१० ते १४/०२/२०१३ च्या कालावधीमधील घेतलेल्या तपासणीत आर.बी.डी. चा साठा ३४७३ लिटर, सनफ्लावर ऑईल ११९ लिटर, वनस्पती ऑईल ४८५ लिटर कमी आढळला तर शेंगदाणा तेल ८७५ लिटर, मस्टर्ड ऑईल २२० लिटर साठा अतिरिक्त आढळला. ७) दिनांक १५/०२/२०१३ रोजीच्या साठयाची मोजदाद केली असता, ४३.५८ क्विंटल साठा आढळला. म्हणजेच ३.५८ क्विंटल खाद्यतेलाचा साठा मर्यादेपेक्षा जास्त आढळला.

सदर धाडीत/तपासणीत जप्त केलेल्या मुद्देमालाचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा | एकूण साठा लिटर्समध्ये | बाजारभावाप्रमाणे किंमत (प्रती लिटर रुपये) | एकूण किंमत | तेलाचे नमुने |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.बी.डी. पामोलीन तेल<br>भुमीगत टाकी - २२५६<br>टाकी क्रमांक १ - ४५२४<br>टाकी क्रमांक ३ - ४०७२<br>टाकी क्रमांक ४ - ८४८<br>एकूण - ११७०० | ११७०० | रु. ५५/- | ६,४३,५००/- | अ/१, अ/२, अ/३, अ/४, ब/१, ब/२, ब/३, ब/४ |
| २ | सुटे आर.बी.डी. पामोलीन तेल | ३२७ | रु. ५५/- | १७,९८५/- | ई/१, ई/२, ई/३, ई/४ |
| ३ | शेंगदाणा तेल | ८७५ | रु. ८०/- | ७०,०००/- | ग/१, ग/२, ग/३, ग/४ |
| ४ | खोबरेल तेल | २७० | रु. १४०/- | ३७,८००/- | ड/१, ड/२, ड/३, ड/४ |
| ५ | राई तेल | ७१० | रु. १००/- | ७१,०००/- | क/१, क/२, क/३, क/४ |
| ६ | कपासी तेल | १०३५ | रु. ९०/- | ९३,१५०/- | - |
| ७ | तिळ तेल | ४४.६० | रु. १५०/- | ६,६९०/- | - |
| ८ | सनफ्लॉवर तेल | ७८१ | रु. १००/- | ७८,१००/- | फ/१, फ/२, फ/३, फ/४ |
| | एकूण | १५७४२.६ | | १०,१८,२२५/- | |

दरम्यान पथकातील अधिकाऱ्यांनी जोगेश्वरी पोलिस ठाणे येथे रितसर खबर दिली व त्याप्रमाणे घटनास्थळी पोलिस अधिकारी श्री. खोत व सहकारी उपस्थित झाले. सदर धाडीत जप्त करण्यात आलेल्या विविध खाद्यतेलांचे नमुने ५०० मि.लि. क्षमतेच्या प्लास्टीकच्या बाटल्यांमध्ये घेण्यात आले व ते पंचांच्या सही शिक्क्यानिशी जागीच सिलबंद करण्यात आले.

अशाप्रकारे मे. हाजीभाई मुसाभाई या खाद्यतेलाच्या घाऊक व किरकोळ व्यापाऱ्याने घाऊक परवान्याचे दिनांक ०७/१२/२०१२ पासून दिनांक १५/०२/२०१३ पर्यंतची घाऊक व किरकोळ परवाना तपासणीमध्ये आढळलेले दोष हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत. परवानाधारकाने घाऊक साठा नोंदवहीत एकूण १० खरेदी बिलाप्रमाणे ९७७५० लिटर खाद्यतेलाची साठ्याची नोंद साठा नोंदवहीत न दर्शविता परस्पर विक्री केल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. सदरचे विक्रीबाबतचे कॅशमेमो ठेवलेले नाहीत. सबब, झालेली विक्री संशयास्पद आढळून येते. सदर परवानाधारकाने घाऊक परवान्यावरील विक्री ही सदर दुकानातून काऊंटर सेल/किरकोळ विक्रीद्वारे

केलेली आहे, असे प्रथमदर्शनी आढळून आले. ईस्माईल,मुसाभाई डेरेय्या व त्यांचे दुसरे भागीदार युसूफ मुसाभाई डेरेय्या यांनी घाऊक परवान्यावरील आवक व विक्री ही कपोलकल्पीत दर्शविलेली आहे. सदर धाडीत घेण्यात आलेल्या तपासणी कालावधीमधील आवक व विक्रीचे अवलोकन करता, सदर परवानाधारकाने साठवणूक केलेल्या शेंगदाणा तेल, तसेच सनफ्लॉवर तेल साठ्याची खरेदी न करता साठवणूक व विक्री केल्याचे दिसून येते. यावरुन खरेदी केलेल्या पामतेलाच्या साठयामध्ये इतर अंतिम उत्पादीत शेंगदाणा, सनफ्लॉवर तेलांमध्ये द्रवपदार्थाच्या सहाय्याने मिश्रीत साठयाची अवैध विक्री केली जात असल्याचे दिसून येते. मे. हाजीभाई मुसाभाईचे भागीदार यांना ते करीत असलेला व्यवसाय संपूर्णत: किरकोळ स्वरुपाचा असून, त्यांनी केवळ खाद्यतेलाची साठा मर्यादा वाढवून मिळावी म्हणून घाऊक परवाना धारण करुन शासनाची दिशाभूल केल्याचे दिसून येते. धाडीमध्ये जप्त करण्यात आलेल्या संपूर्ण खाद्यतेलाचा १४६.१२ क्विंटल साठा हा किरकोळ परवानाधारकास विहीत करण्यात आलेल्या ४० क्विंटल या कमाल साठवणूक मर्यादेपेक्षा १०६.१२ क्विंटल एवढा साठा अधिक आढळून आला. सदरचा अधिक साठवणूक केलेला विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा साठा हा परवानाधारकाने साठेबाजी व नफेखोरीच्या उद्देशाने साठवणूक केल्याने परिणामी स्थानिक बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण होऊन खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तूच्या साठयाची भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याने पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० तसेच महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ तसेच त्या अनुषंगाने देण्यात आलेल्या परवान्यावरील अटी व शर्तीचा तसेच महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ च्या अनुषंगाने देण्यात आलेल्या परवान्यावरील अटी व शर्तीचा भंग केल्याने त्यांचेविरुद्ध जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०४/२०१३, दिनांक १६/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १२/०३/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. हाजीभाई मुसाभाई चे भागीदार युसुफ मुसाभाई डेरेय्या यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत.

अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे पत्र क्र. एफटीएल/एफडीओ/२०/१३ अन्वये दिनांक १६/०४/२०१३ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेल्या पृथ:करण अहवालामध्ये, " and I am of the opinion that above Samples No T-69, T-73, T-79, T-82, T-87, T-90 and T-93 confirm to the standards of Palmolein Oil, Mustard Oil, Coconut Oil, Sunflower Oil and Groundnut Oil, as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011 Respectively.", असे नमूद आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. हाजी मुसाभाईचे भागीदार युसूफ मुसाभाई डेरेय्या यांनी सादर केलेल्या निवेदनात, मे. हाजी मुसाभाई शॉप नं. ४, ईक्बाल बिल्डींग, गुंफा रोड, बँक ऑफ बरोडा जवळ, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४००.०६० नावे घाऊक व किरकोळ खाद्यतेलाचा व्यवसाय परवाना क्र. २६/ड/धा/२ दिनांक ३१/१२/१४ आणि २६/ड/आर/१ दिनांक ३१/१२/१४ असून तो २०१४ पर्यंत विधीग्राह्य आहे. सदर परवाना खाद्यतेलाची किरकोळ आणि घाऊक विक्री करत आहे. त्याचे दुकानात दिनांक १५/०२/२०१३ रोजी आपल्या कार्यालयातील फिरते पथकांनी भेट देऊन परवाना व दुकानाची तपासणी केली. तपशिल आढवलेल्या तेलाबाबत तो पुढीलप्रमाणे खुलासा देत आहे. १) साठाफलक / भावफलक हे दोन्ही दुकानाच्या प्रवेशद्वारावर लावलेला होता, नजरचुकाने अधिकाऱ्यांना दिसले नसेल. २) साठापुस्तक तो रोज लिहित होता. परंतू दिनांक १४/०२/२०१३ रोजी अतिमहत्त्वाचे काम असल्यामुळे फक्त दिनांक १४/०२/२०१३ रोजी लिहू शकलो नाही. यापुढे तो व्यवस्थितपणे साठापुस्तक लिहेल त्यांची हमी देत आहे. ३) माहे २०११ मध्ये पामतेलाची एकूण विक्रीमध्ये फक्त १ लिटरचे फरक नोंदविले आहे. परंतू ७१०९ लिटर्स विक्री करता १ लिटरचे तेल फरक होऊ शकतो. ४) माहे जुलै, २०११ विक्री १६१२५ लिटर्स असताना साठा नोंदवहीमध्ये २२५ लिटर्सचा फरक दाखवला आहे. कारण त्यांनी त्यांची पेकींग करतांना प्रत्येक डब्यात वजन जास्त जातातच आणि तेल सांडतात म्हणून हा २२५ लिटरचा फरक होऊ शकतो. ५) माहे ऑगस्ट, २०१२ मधील अखेरची शिल्लक ४६३६० असताना सप्टेंबर २०१२ मध्ये आरंभीची शिल्लक ४६३२५ लिटर्स साठापुस्तकात दर्शविल्याने फरक ३५ लिटर्स आला आहे. इतका तर पुढे मागे होऊ शकतो. ६) मागील तपासणी दिनांक ०७/१२/२०१२ ते १५/०२/२०१३ पर्यंत ईम्पोटेड पामऑईल तेल एकूण ५६ बिलांपैकी २ बिल सादर केले होते व बाकी ५४ बिल त्याच्या सी.ए. बिल असल्याने त्या समयी दाखवू शकलो नाही. आता तो सादर करीत आहे. ७) ९७९५० लिटर्स आर.बी.डी. पामऑईल साठाना दर्शविता त्यांचे परस्पर विक्री झाले तसेच कॅश मेमो याबाबत खुलासा करतो की, पामऑईल साठ्याची नोंद त्याने साठा नोंद न केली आहे. परंतू सदर साठ्याचे

बिल बुक सादर करतो. ८) वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३, मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०००३२ दिनांक ९ मे, २००८ चे अनुक्रमांक ६ प्रमाणे शासनाने लागू केलेल्या गहू, तांदूळ, खाद्यतेल व खाद्यतेल बिया यांच्या साठा मर्यादेबाबत लागू केलेले निर्बंध हे ह्या वस्तू आयात केल्यास त्यावर लागू राहणार नाही. जर त्यामधून पामऑईल, ई-सनफ्लावरचा नमूद केलेला साठा वगळण्यास सदरचा साठा मर्यादेच्या आत आहे ते स्पष्ट होते. त्यामुळे आपल्या अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाहीनुसार जप्त केलेला मुद्देमाल मुक्त करावा. त्यामुळे तो परवानातील वरील अटी व शर्तीचे पालन करीत नाही ते म्हणणे रास्त नाही. तसेच त्याला खाद्यतेल व वनस्पती तेलाचा व्यवसाय करण्याची अनुमती द्यावी. त्याने वर नमुद केल्याप्रमाणे त्याचा व्यवसाय हा विहीत केलेल्या मर्यादेमध्येच असलेले तो स्पष्ट करीत आहे. त्यामुळे मर्यादे पेक्षा जास्त साठेची साठवणूक करुन कृत्रिम टंचाई निर्माण होऊन स्थानिक बाजारपेठेत भाववाढीस प्रोत्साहन दिल्याबाबतचे म्हणणे संयुक्तीक नाही. तसेच तेलाचा व्यवसाय हा त्यांचा पारंपारीक असून त्यांचा ग्राहक हा सुध्दा ठरलेल्या असल्यामुळे तेलामध्ये भेळसेळ करुन विक्री केली जाते हे म्हणणे सुध्दा अनाठाई आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

पोलिस उपनिरिक्षक, जोगेश्वरी पोलिस ठाणे यांचे दिनांक १३/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात; नमूद गुन्ह्यातील आरोपी नामे इस्माईल मुसाभाई डेरेय्या तसेच युसूफ मुसाभाई डेरेय्या यांना दिनांक १६/०२/२०१३ रोजी अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाने रुपये १५,०००/- रुपयाचे जामिनावर सोडण्यात आले आहे. नमूद गुन्ह्याचे साक्षीदारांचे जबाब नोंद करीत असून नमूद गुन्ह्याचे संदर्भाने पंचनाम्याअंतर्गत ताब्यात घेण्यात आलेले तेलाचे नमुने याचा अहवाल प्राप्त करीत आहोत. तसेच आपले कार्यालयाकडून नोटीस प्राप्त झाले असून उपरोक्त गुन्ह्यातील संबंधीत आरोपीतास नोटीसची बजावणी करण्यात आली आहे. नमुद गुन्ह्यात मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असून पुढील आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १५/०२/२०१३ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, कार्यालयाच्या अधिपत्याखालील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह हाजीभाई मुसाभाई, दुकान क्रमांक ४, इक्बाल इमारत, गुंफा रोड, जोगेश्वरी (पूर्व) येथे भेट देऊन तपासणी केली असता सदर पत्त्यावर मे. हाजीभाई मुसाभाई या व्यापारी नावाने एकाच पत्यावर खाद्यतेलाचा घाऊक तसेच किरकोळ परवाना धारण केल्याचे आढळुन आले. सदर तपासणीच्यावेळी परवानाधारकास देण्यात आलेल्या घाऊक अथवा किरकोळ परवान्यांमधील

अटी व शर्तीनुसार योग्यते पालन न केल्याचे आढळुन आल्याने तपासणीमध्ये गंभीर तसेच किरकोळ स्वरुपाचे दोष आढळुन आले आहेत. तसेच मे. हाजीभाई मुसाभाई या खाद्यतेलाच्या घाऊक व किरकोळ व्यापाऱ्याने घाऊक परवान्यावर दिनांक ०७/१२/२०१२ पासून दिनांक १५/०२/२०१३ पर्यंतची घाऊक व किरकोळ परवाना तपासणीमध्ये आढळलेले दोष हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत. परवानाधारकाने घाऊक साठा नोंदवहीत एकूण १० खरेदी बिलाप्रमाणे ९७७५० लिटर खाद्यतेलाची साठ्याची नोंद साठा नोंदवहीत न दर्शविता परस्पर विक्री केल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. सदरचे विक्रीबाबतचे कॅशमेमो ठेवलेले नाहीत. सबब, झालेली विक्री संशयास्पद आढळून येते. सदर परवानाधारकाने घाऊक परवान्यावरील विक्री ही सदर दुकानातून काऊंटर सेल/किरकोळ विक्रीद्वारे केलेली आहे, असे प्रथमदर्शनी आढळून आले. ईस्माईल मुसाभाई डेरेय्या व त्यांचे दुसरे भागीदार युसूफ मुसाभाई डेरेय्या यांनी घाऊक परवान्यावरील आवक व विक्री ही कपोलकल्पीत दर्शविलेली आहे. सदर धाडीत घेण्यात आलेल्या तपासणी कालावधीमधील आवक व विक्रीचे अवलोकन करता, सदर परवानाधारकाने साठवणूक केलेल्या शेंगदाणा तेल, तसेच सनफ्लॉवर तेल साठ्याची खरेदी न करता साठवणूक व विक्री केल्याचे दिसून येते. यावरुन खरेदी केलेल्या पामतेलाच्या साठयामध्ये इतर अंतिम उत्पादीत शेंगदाणा, सनफ्लॉवर तेलामध्ये द्रवपदार्थाच्या सहाय्याने मिश्रीत साठयाची अवैध विक्री केली जात असल्याचे दिसून येते. मे. हाजीभाई मुसाभाईचे भागीदार यांना ते करीत असलेला व्यवसाय संपूर्णतः किरकोळ स्वरुपाचा असून, त्यांनी केवळ खाद्यतेलाची साठा मर्यादा वाढवून मिळावी म्हणून घाऊक परवाना धारण करुन शासनाची दिशाभूल केल्याचे दिसून येते. धाडीमध्ये जप्त करण्यात आलेल्या संपूर्ण खाद्यतेलाचा १४६.१२ क्विंटल साठा हा किरकोळ परवानाधारकास विहीत करण्यात आलेल्या ४० क्विंटल या कमाल साठवणूक मर्यादेपेक्षा १०६.१२ क्विंटल एवढा साठा अधिक आढळून आला. सदरचा अधिक साठवणूक केलेला विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा साठा हा परवानाधारकाने साठेबाजी व नफेखोरीच्या उद्देशाने साठवणूक केल्याने परिणामी स्थानिक बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण होऊन खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तूच्या साठयाची भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याने पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद करुन एकुण रुपये १०,१८,२२५/- एवढ्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मे. हाजीभाई मुसाभाईचे भागीदार युसूफ मुसाभाई डेरेय्या यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, मे. हाजी मुसाभाई शॉप नं. ४, ईक्बाल बिल्डींग, गुंफा रोड, बँक ऑफ बरोडा जवळ, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०० ०६० या नावे खाद्यतेलाचा घाऊक व किरकोळ परवाना क्र. २६/ड/घा/२ आणि २६/ड/आर/१ असून तो दिनांक ३१/१२/२०१४ पर्यंत विधीग्राह्य आहे. सदर परवानाधारक खाद्यतेलाचा व्यवसाय करत आहे. तपासणीमध्ये आढळुन आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने साठामालक यांनी सादर केलेल्या खुलासामध्ये साठाफलक/भावफलक हे दोन्ही दुकानाच्या प्रवेशद्वारावर लावलेला होता, नजरचुकाने अधिकाऱ्यांना दिसले नसेल, साठापुस्तक तो रोज लिहित

होता. परंतू दिनांक १४/०२/२०१३ रोजी अतिमहत्त्वाचे काम असल्यामुळे फक्त दिनांक १४/०२/२०१३ रोजी लिहू शकलो नाही. यापुढे तो व्यवस्थितपणे साठापुस्तक लिहेल त्यांची हमी देत आहे, माहे २०११ मध्ये पामतेलाची एकूण विक्रीमध्ये फक्त १ लिटरचे फरक नोंदविले आहे. परंतू ७१०९ लिटर्स विक्री करता १ लिटरचे तेल फरक होऊ शकतो, माहे जुलै, २०११ विक्री १६१२५ लिटर्स असताना साठा नोंदवहीमध्ये २२५ लिटर्सचा फरक दाखवला आहे. कारण त्यांनी त्यांची पेकींग करतांना प्रत्येक डब्यात वजन जास्त जातातच आणि तेल सांडतात म्हणून हा २२५ लिटरचा फरक होऊ शकतो, माहे ऑगस्ट, २०१२ मधील अखेरची शिल्लक ४६३६० असताना सप्टेंबर २०१२ मध्ये आरंभीची शिल्लक ४६३२५ लिटर्स साठापुस्तकात दर्शविल्याने फरक ३५ लिटर्स आला आहे. इतका तर पुढे मागे होऊ शकतो, मागील तपासणी दिनांक ०७/१२/२०१२ ते १५/०२/२०१३ पर्यंत ईम्पोटेड पामऑईल तेल एकूण ५६ बिलांपैकी २ बिल सादर केले होते व बाकी ५४ बिल त्याच्या सी.ए. बिल असल्याने त्या समयी दाखवू शकलो नाही. आता तो सादर करीत आहे, ९७९५० लिटर्स आर.बी.डी. पामऑईल साठाना दर्शविता त्यांचे परस्पर विक्री झाले तसेच कॅश मेमो याबाबत खुलासा करतो की, पामऑईल साठ्याची नोंद त्याने साठा नोंद न केली आहे. परंतू सदर साठ्याचे बिल बुक सादर करतो. अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाहीनुसार जप्त केलेला मुद्देमाल मुक्त करावा. त्यामुळे तो परवानातील वरील अटी व शर्तीचे पालन करीत नाही ते म्हणणे रास्त नाही, असे सांगितले आहे.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत. त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

मे. हाजीभाई मुसाभाईचे मालक/भागीदार यांचेकडे घटनास्थळी नमूद पत्त्यावर खाद्यतेलाचा महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये घाऊक परवाना क्र. २६/ड/घा/२ व महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ अन्वये किरकोळ परवाना क्र. २६/ड/आर/१ असुन सदरचे दोन्ही खाद्यतेलाचे परवाने हे दिनांक ३१/१२/२०१४ पर्यंत विधीग्राह्य असल्याचे दिसुन येते. सदर परवानाधारकाकडे तपासणीच्यावेळी घाऊक तसेच किरकोळ असे दोन्ही प्रकारचे खाद्यतेलाचे परवाने हे एकाच व्यवसायिक पत्त्यावर धारण केल्याचे आढळुन आले. प्रचलित पद्धतीनुसार अनुसूचित वस्तूंच्या व्यापाऱ्यांना घाऊक अथवा किरकोळ व्यापारी असे संबोधले जाते. म्हणजेच घाऊक व्यापारी असल्यास तो किरकोळ व्यापाऱ्यांना घाऊक दराने तसेच किरकोळ व्यापारी असल्यास तो थेट उपभोक्त्यांना अथवा ग्राहकांना किरकोळ दराने विक्री करीत असल्याची या कार्यालयाची धारणा आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... ICE

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम २(z)(vi) अन्वये "Wholesale Dealer means- In relations to any edible oilseeds or edible oil a person who, whether for commission, remuneration or otherwise carries on the business of purchase, sale or storage for sale edible oilseeds or edible oils in quantities exceeding twentry quintals at any one time to other dealers or other persons at wholesale rates and includes a commission agent or a sub-wholesalers, who holds stocks of edible oilseeds or edible oils in the conduct of his business " असे नमूद आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु किरकोळ व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९७९ चे कलम २(j)(vi) अन्वये " retail dealer means- In ralations to any edible oil, a person who, whether for commission, remuneration or otherwise carries on the business of selling any hydrogenated vegetable oil only or other edible oils only or both, stores them for sale in quantities exceeding fifteen quintals in the aggregate at any one time and sells them to any other persons for consumption and not for re-sale" असे नमूद आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता मे. हाजीभाई मुसाभाई या परवानाधारकाच्या तपासणीमध्ये सदर परवानाधारकाचा व्यवसाय हा किरकोळ स्वरुपाचा असुन तो त्याच्या दुकानातून काऊंटर सेलद्वारे प्रत्यक्ष उपभोक्त्यांना अथवा ग्राहकांना त्यांच्या स्वत:च्या गृहपयोगी वापर करण्याकरीता खाद्यतेलाची किरकोळीने विक्री करीत असल्याचे आढळुन आले आहे. सदर बाब विचारात घेता मे. हाजीभाई मुसाभाई या परवानाधारकाने केवळ साठवणूकीची क्षमता अथवा कमाल मर्यादा वाढवुन मिळावी म्हणून त्याने संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकरणाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभूल करुन खाद्यतेलाचा घाऊक परवाना धारण केला आहे. म्हणजेच घाऊक परवान्याच्या अनुषंगाने घाऊक दराने मोठ्या प्रमाणात खाद्यतेलाचा साठा खरेदी करुन सदर साठ्याची प्रचलित पद्धतीनुसार घाऊक दराने किरकोळ व्यापाऱ्यांना विक्री न करता तो संपूर्ण साठा हा त्याने स्वत: धारण केलेल्या किरकोळ परवान्यावर किरकोळ दराने विक्री करण्याकरीता केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. यावरुन सदर साठामालक हे किरकोळ व्यापारी असल्याचे निष्पन्न होत आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ चे कलम १०(१) अन्वये "No licensee or his agent or servant or any other person acting on his behalf shall contravene any of the terms and conditions of the license " असे नमूद आहे.

कलम १२ अन्वये " Maintenance of registers of accounts- Every licensee shall maintain a register of accounts as laid down in the terms and conditions of his licence and show therein such other particulars of daily accounts as the licensing authority may specify " असे नमूद आहे.

CONTROLLER OF RATIONING AND ... HEAD OFFICE MUMBAI

कलम १४(c)(i) अन्वये Seize " Any stock of scheduled commodities in respect of which he has reasons to believe that a contravention of any provisions of this order has been, is being, or is about to be commited " असे नमूद आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ चे कलम ४ अन्वये देण्यात आलेल्या किरकोळ परवानामधील अट क्र. ३(i) नुसार The licensee shall, except when specifically exempted by the State Government or by the licensing authority in this behalf maintain a register or daily accounts for each of the commodities mentioned in paragraph (i) showing correctly –

(e) the opening stock of each day.

(f) the quantities received on each day showing places and source of quantities.

(g) the quantities, delivered or otherwise removed on each day, showing the places and source of quantities; and

(h) the closing stock on each day.

अट क्र. ६ अन्वये The licensee shall not-

(i) enter into any transaction involving purchased, sale or storage for sales of commodities in a speculative manner prejudicial to the maintenance and easy availability of supplies of the commodities in the local market असे नमूद आहे.

अट क्र. ७ अन्वये The licensee shall exhibit at the business premises, the price list of the commodities held by him for sale. Such price list shall be legibly written in marathi or in the principal language of the locality concerned. It shall indicate separately the selling prices of different varieties of the commodities असे नमूद आहे.

अट क्र. ८ अन्वये The licensee shall, except when specifically exempted by the State Government or by the licensing authority in this behalf, issue to every customer, a correct receipt or invoice or cash memo, as the case may be, for any sale exceeding Rs. 100 giving his own name, address, licence number, date of transaction, the quantity sold the price per kg/liter/package/tin and total amount charged and the name and address of customer and shall keep duplicate of the same to be made available for inspection on demand by the licensing authority of any other officer duly authorized in this behalf असे नमूद आहे.

अट क्र. १० अन्वये The licensee shall comply with any directions that may be given to him by the State Government or by the licensing authority in regard to purchase, sale and storage for sale of the commodities and in regard to the language in which this register, returns, receipts or invoice mentioned paragraphs (3), (4), (7) and (8) shall be written and the authentication of maintenance of the same असे नमूद आहे.

अट क्र. १३ अन्वये The licensee shall by liable for departmental action, prosecution or both as the case may be for the breach of any condition of this licence or any directions or orders issued by the State Government or licensing authority from time to time. असे नमूद आहे.

सदर तपासणीमध्ये प्रामुख्याने आढळुन आलेल्या त्रुटींमध्ये साठाफलक/भावफलक लावलेला नसल्याचे, साठापुस्तक अद्ययावत नसल्याचे, खाद्यतेलाचा प्रत्यक्ष शिल्लक साठा हा साठापुस्तकापेक्षा अतिरिक्त आढळल्याचे, तपासणीच्यावेळी आवक झालेल्या व साठा नोंदवहीमध्ये नोंद घेतलेल्या आवक नोंदीनुसार खरेदी बिले अनुपलब्ध असल्याचे, तपासणीच्यावेळी सादर केलेल्या काही आवक बिलांनुसार आवक साठापुस्तकात न दर्शविता परस्पर विक्री केल्याचे, विक्रीबाबतचे कॅशमेमो ठेवले नसल्याचे, या सर्व त्रुटींचे अवलोकन करता मे. हाजीभाई मुसाभाई या परवानाधारकाने त्यांच्या घाऊक परवान्यावर दर्शविलेली विक्री ही बेकायदेशीर तसेच साशंकता निर्माण करणारी आहे. त्याअनुषंगाने किरकोळ परवान्याच्या तपासणीमध्ये साठापुस्तकात एकुण ९५ आवक नोंदी दर्शविल्या असुन प्रत्यक्षात परवानाधारकाने आवक साठ्याची खरेदी बिले सादर केली नसल्याने मे. हाजीभाई मुसाभाई यांनी घाऊक परवाना वरील विक्री ही सदर दुकानातून काऊंटर सेलद्वारे किरकोळीने केल्याचे सिद्ध होत असल्याने मे. हाजीभाई मुसाभाई चे मालक/भागीदार यांनी त्यांना देण्यात आलेल्या परवान्याच्या अटी व शर्तींचा भंग केल्याचे निष्पन्न होत आहे.

शासनाने आजमितीस वेळोवेळी पारित केलेल्या साठा मर्यादेच्या आदेशामध्ये साठवणूकीची कमाल मर्यादा ही घाऊक व्यापाऱ्यांस किरकोळ व्यापाऱ्यापेक्षा अधिक ठरवून दिलेली आहे. **"महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध) आदेश (सुधारणा) आदेश, २०१०"** अन्वये पारित केलेल्या साठा मर्यादेच्या आदेशामध्ये खाद्यतेल (वनस्पती तेलासह) करीता महानगरपालिका क्षेत्रात घाऊक व्यवसायासाठी १०००. क्विंटल तसेच किरकोळ व्यवसायासाठी ४० क्विंटल विहीत कमाल मर्यादा नमूद आहे.

मे. हाजीभाई मुसाभाईचे मालक/भागीदार यांनी तपासणीचेवेळी परवानाधारक म्हणून विक्री नोंदवही ठेवली नसल्याने ते कोणास व कोणते तेल किती विक्री करतात हे समजून येत नाही. तसेच कोणत्याही प्रकारचा माहिती फलक, साठा फलक व भावफलक प्रदर्शित केलेला नाही. तसेच ग्राहकास पावती देणे बंधनकारक असताना व पावतीवर परवानाधारकाचे नांव, पत्ता, परवाना क्रमांक, ग्राहकांचे नांव, दिनांक, विक्री परिमाण, किंमत आणि एकुण किंमत दर्शविणे व सदर पावतीची स्थळप्रत ठेवणे आवश्यक असताना अशा कोणत्याही पावती पुस्तकांच्या स्थळप्रती तपासणीचे वेळेस सादर केले नाही. मे. हाजीभाई मुसाभाईचे मालक/भागीदार यांनी तपासणीचे वेळी घटनास्थळी आवश्यक महत्वपूर्ण अभिलेख सादर केला नाही व तसे सादर न केल्याचे कबुल केले आहे. मे. हाजीभाई मुसाभाई या नांवे खाद्यतेलाचा किरकोळ व्यवसाय करीत असतांना साठा मालक म्हणुन ते करीत असलेल्या व्यवसायात व त्या अनुषंगाने आवश्यक अभिलेखात पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. परंतु तपासणीचे

वेळी पथकास या महत्वपूर्ण बाबींचा अभाव असल्याचे सिध्द झाले आहे. प्रचलित नियमानुसार व्यवसाय करीत असतांना परवानाधारकास साठा खरेदी करतांना पुरवठादाराकडून खरेदी बिले प्राप्त करणे त्या अनुषंगाने साठा पुस्तकात नोंदी घेणे तसेच ते विक्री करीत असलेल्या विविध प्रकारच्या खाद्यतेलाची प्रत्यक्षात उपभोक्त्यास विक्री करीत असतांना त्यांनी केलेल्या प्रत्येक विक्री व्यवहाराची बिले तयार करुन त्याचवेळेस उपभोक्त्यास देणे बंधनकारक आहे. तथापी, मे. हाजीभाई मुसाभाईचे मालक/भागीदार यांनी घटनास्थळी विक्री पुस्तक अथवा विक्री बिलांचा कोणताही तपशिल/अभिलेख सादर केला नसल्याने ते विना विक्री बिलांची अवैध विक्री करीत असल्याने त्यांचा संपूर्णत: अवैध व्यवसाय असल्याचे निष्पन्न होत आहे. सदर गैरकृत्यामुळे मे. हाजीभाई मुसाभाईचे मालक/भागीदार यांनी परवानाधारक म्हणुन शासनाची विश्वासार्हता गमावली आहेच याशिवाय त्यांनी सदरचा अवैध व्यवसाय कार्यरत ठेवून इतर संबंधित शासकिय विभागांचीही दिशाभुल केली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सदर बाब विचारात घेता मे. हाजीभाई मुसाभाईचे मालक/भागीदार हे खाद्यतेलाचा किरकोळ व्यवसाय करीत असल्याचे सिध्द होत असल्याने सदर परवानाधारकास त्याच्या व्यवसायाचे स्वरुप पाहता त्यास किरकोळ व्यवसायाकरीता अनुज्ञेय असलेली ४० क्विंटल ही विहीत कमाल मर्यादा लागू होत आहे. सदर प्रकरणी तपासणीमध्ये आढळुन आलेल्या एकुण १४६.१२ क्विंटल विविध खाद्यतेलाच्या साठ्यापैकी १०६.१२ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा अतिरिक्त साठवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता मे. हाजीभाई मुसाभाईचे मालक/भागीदार यांनी महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ तसेच महाराष्ट्र अनुसूचित वस्तु किरकोळ व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९७९ या आदेशाचे तसेच सदर आदेशान्वये देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी व शर्तीचे भंग केल्याचे सिध्द होत आहे. सबब, मे. हाजीभाई मुसाभाई यांनी धारण केलेल्या किरकोळ परवानाच्या अनुषंगाने त्यांचा घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या १४६.१२ क्विंटल साठयापैकी ४० क्विंटल साठा मुक्त करण्याचे तसेच उर्वरीत अतिरिक्त आढळुन आलेला १०६.१२ क्विंटल विविध खाद्यतेलाचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०४/२०१३, दिनांक १६/०२/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश :-</u>

१) मे. हाजीभाई मुसाभाई यांचा विविध खाद्यतेलाचा जप्त केलेल्या एकुण १४६.१२ क्विंटल साठयापैकी ४० क्विंटल साठा हा मुक्त करण्यात यावा.

२) मे. हाजीभाई मुसाभाई यांचा विविध खाद्यतेलाचा अतिरिक्त आढळुन आलेला १०६.१२ क्विंटल साठा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण खाद्यतेलाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,
१) मे. हाजीभाई मुसाभाई चे भागीदार इस्माईल मुसाभाई डेरेय्या
२) मे. हाजीभाई मुसाभाई चे भागीदार युसूफ मुसाभाई डेरेय्या
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,
१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.